# ग्रीनलॉन्स विदयालय

दिनांक – ३-१०-२०२५ **TERMINAL EXAMINATION (2025)** वेळ – २ तास

इयत्ता - ८ वी - अ,ब,क **मराठी** मार्क - ८०

**INSTRUCTIONS:-** 1.This paper comprises of two sections. Section A and B.

2. Section A answers must be written on the answer sheet.

3. Section B answers must be written on the paper itself. And Attach paper with section A answer sheet

## विभाग - "अ " [४० मार्क]

**प्रश्न १. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

प्रथम निसर्ग. आपण निसर्गाला कधीही विसरून चालणार नाही. त्याच्या विरोधात न जाता मर्जीत राहणं केव्हाही आपल्या फायद्याचं आहे. निसर्गातून आपलं पालनपोषण होतं आणि निसर्गच आपल्याला नाना कला शिकवतो. निसर्ग धुंडाळत रहा, तुम्हांला सर्जनाच्या वाटा आपसूक सापडतील. माझं प्राथमिक शिक्षण एका लहानशा खेड्यात झालं. माझं खेडं अतिशय निसर्गरम्य आणि सुसंस्कृत होतं. घनदाट जंगलं. दुथडी भरून वाहणारी नदी. निळे डोंगर, हिरवी रान हे सौदर्य वाढवणारे घटक आहेत. अशा वातावरणात माणसातली सर्जनशीलता उफाळून आली नाही तर नवलच! माझा एक मित्र होता. आम्हांला खूप वाटायचं, की आपण चित्रं काढावीत; पण काय करणार? आमच्याकडे कसलीच साधनं नव्हती. पेन्सिल, रंग, ब्रश हे तर सोडाच, साधा कागदही नव्हता. अभ्यासाची एकच वही. पाटीवर लिहिण्याची एक पेन्सिल. तिचे तुकडे झाले, तरी सांभाळून वापरावी लागायची. दुसरी मिळण्याची शक्यता नव्हती. शिवाय सगळ्यात मोठी अडचण किंवा धाक असा होता, की चित्रंबित्रं काढलेली ना मास्तरांना आवडायची ना घरातल्यांना. वात्रटपणा वाटायचा.

वैशाख महिन्यातलं ऊन करपवून टाकणारं असायचं. आम्ही गावातली सगळी मुलं नदीच्या डोहात जाऊन पडायचो. अंगात गारवा भरला, की पुन्हा काठावर येऊन बसायचं. काठालगत खूप खडक होते. प्रवाहामुळं गुळगुळीत,सपाट झालेले,लांबरुंद पसरलेले. आम्हाला तिथंच आमचा कॅनव्हास सापडला. या भल्या थोरल्या खडकावर मनसोक्त चित्रं काढता येणार होती; पणं कशानं काढणार? तोही मार्ग सापडला. आमच्या त्या भागात तांबूस रंगाचा मुरुम असतो. शिवाय पिवळट रंगाचे दगडही सापडतात. ते दगड आपटले, की त्याची पिवळी पिवळी फक्की पडते. अगदी पिठासारखी असते. हवं तसं पाणी घातलं, की पिवळा रंग तयार! मुरुमाचा खडा ओला एक करून घेतला आणि खडकावर चित्रं रेखाटणं सुरू झालं. काय काढू आणि काय नको असं व्हायचं. गुडघ्यावर टेकून रेष काढण्यात दंग व्हायचो. रेषा काढीत हातभर

सरकल्यावर मागे वळून पाहावं,तर रेषा वाळून लालजर्द झालेल्या असायच्या. आणखी सुरसुरी यायची, तापलेल्या खडकावर टेकून टेकून गुडघ्याची सालटं गेलेली लक्षातच यायची नाहीत. मग उभ्या खडकावर चित्रं काढणं सुरू झालं. काही दिवसांनी वाटायला लागलं, की यात रंग भरावेत; पण ते कुठून आणणार? त्या दिवसांत काटेसावर फुलते, लालभडक होते. तिच्या फुलातले पराग पाण्यात वनस्पतीच्या बोंडातल्या बिया भगवा रंग देतात. काही पानांचा हिरवा केला. चुन्याचा पांढरा, कुंकवाचा लाल आणि दगडाचा पिवळा होताच. बांबूची कोवळी काडी घेऊन पुढचं टोक ठेचलं, की त्याचा ब्रश व्हायचा. थोड्या दिवसांनी पाऊस यायचा. नदी वाहायला लागायची. आमची चित्रं नदीच्या पोटात गडप व्हायची.

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **[४]**

१. लेखकाचे प्राथमिक शिक्षण कोठे झाले?

२. लेखकाचे खेडं कसे होते?

३. लेखकाला सगळ्यात मोठी अडचण किंवा धाक काय होता?

४. लेखकाला ब्रश कसा व्हायचा?

**कृती २. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.** **[२]**

१. लेखकाच्या खेड्याचे सौदर्य वाढवणारे घटक कोणते?

**कृती ३. रिकाम्या जागा भरा.** **[१]**

१. आमच्या त्या भागात ---------------------- रंगाचा मुरूम असतो.

२. आम्हाला तिथंच आमचा ---------------------- सापडला.

**कृती ४. समानार्थी शब्द लिहा.** **[१]**

( शहर, दंग , खेडे, निमग्न )

१. मग्न - ----------------------  २. गाव - ------------------------------

**कृती ५. वचन बदला.** **[२]**

( वही , वहि , नदी , पेन्सिल , नदि , पेन्सील , वाटा , वाटे )

१. वाट - ----------------------  २. पेन्सिली - ------------------------------

३. नदया - ----------------------  ४. वह्या - ------------------------------

**प्रश्न २.(अ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही ५) ANY 5 गुण ५**

१. अमूल्य शिकवण कोणाची आहे?

२. जिव्हाताईने कोणती तक्रार केली?

३. नातवंडांस पत्र या पाठाचे लेखकाचे नाव काय आहे?

४. लेखकाला कोणता पुरस्कार मिळाला होता?

५. आपण सारे एक या पाठाच्या कवयित्री कोण आहेत?

६. प्रभात कवितेचे कवी कोण आहेत?

७. चित्र काढताना वापरला जाणारा कागद कोणता होता?

**प्रश्न २. (ब) खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा. (ANY ३) गुण ६**

१. जिव्हाताईची कामे सांगा?

२. लेखकाने सुचवलेले सुट्टीतील मजेशीर अनुभव कोणते?

३. कवीच्या मते व्यक्तित्वाच्या प्रयोगशाळेत कोणते गुण रुजतील?

४. पदकुमार आणि हस्तराज यांनी काय निश्चय केला?

**प्रश्न ३ खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. ( ANY 1 ) गुण ५**

१. तुमच्या लहान भावाला ( TO your younger brother) कथा-कथन स्पर्धेत ( in story telling Competition ) प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ( First prize )मिळाले आहे. त्याबददल अभिनंदन करणारे पत्र ( Congratulation letter ) लिहा.

२. गणवेश व वह्या – पुस्तके ( getting school uniform and books from school ) मिळाल्यानंतर आभार मानणारे पत्र( Gratitude letter ) तुमच्या मुख्याध्यापकांना ( TO YOUR PRINCIPAL) लिहा.

**प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. ( ANY 1) गुण ६**

१. आई संपावर गेली तर ! ( If the mother goes on strike )

( मुददे -  तुमच्या घरात कोण कोण राहतात -  घरात जास्त कोण काम करतात – आईचे नाव – आईचा स्वभाव – आई संपावर गेली तर कोण आणि कसे काम करणार – आईचे प्रेम कसे मिळेल – फायदे आणि तोटे )

२. माझा आवडता प्राणी ( My favourite animal )

( मुददे -  जगात किती प्रकारचे प्राणी आहेत – तुम्हाला कोणकोणते  प्राणी माहिती आहेत- त्यांची नावे काय काय आहेत – तुम्हाला आवडणारा प्राणी कोणता – तो  तुम्हाला का आवडतो )

३. माझे आजोबा  ( My grandfather )

(मुददे - आजोबांचे नाव - त्यांचे वर्णन - त्यांचा स्वभाव - त्यांची कोणती गोष्ट आवडली - तुम्हाला  का आवडतात )

**प्रश्न ५.  खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

बाबा आमटे यांचे खरे नाव मुरलीधर देवीदास आमटे. त्यांचा जन्म २६ डिसेंबर १९१४ रोजी हिंगणघाट, वर्धा येथे झाला. आमटे घराण्याचे कुलदीपक. ते सावळे म्हणून नाव कृष्णाचे; पण त्यांची आई त्यांना लाडाने 'बाबा' म्हणे, त्यांच्या आईला तेव्हा काही अंतर्ज्ञान झाले असेल  की, पुढे आपला हा मुलगा शेकडो लोकांचा खरेच 'बाबा' होणार आहे ?

खरे तर बाबा आमटे स्वतः एका जमीनदार घरात, श्रीमंतीत वाढलेले होते. मोटार , कार चालवायची, शिकारीला जायचे, कुस्ती खेळायची, ब्रिज खेळायचे असे अनेक श्रीमंती शौक होते. एवढेच नाही तर महागडे अन् अतिशय चोखंदळपणे निवडलेले सूट घालणे ही त्यांची एक आवड होती. बाबा अतिशय रसिक तर होतेच; पण कलाविष्कारात अत्यंत रमणारे हाते.

बाबा आमटे यांचे डॉक्टर व्हायचं ध्येय असूनदेखील वडिलांच्या इच्छेखातर ते वकील झाले. नागपूरमध्ये वकिली सुरू करून देखील त्यांचे मन मात्र वरोऱ्याला धाव घेत होते. त्यांना स्पृश्यास्पृश्य हा भेद मान्य नव्हता, त्यामुळे त्यांच्या ब्राह्मणवादी वडिलांना ते पटत नव्हते. मात्र त्यांची आई अशा अनेक साहसांत त्यांच्या पाठीशी होती. ती त्यांची प्रथम शिक्षिका होती. त्यांच्या आईनेच त्यांना चौकटीबाहेर विचार करण्याचे शिकविले, सामर्थ्य दिले.

असे हे बाबा एकदा रस्त्यात कुष्ठरोगी पाहून घाबरून घरी पळाले; पण घरी आल्यावर अत्यंत अस्वस्थ झाले. त्यांना रात्री झोप लागली नाही अन् ते तडक उठून त्या कुष्ठरोग्याकडे गेले आणि त्याला घरी आणून त्याची सेवा केली; हे तुम्हाला खरं वाटेल ? एका व्यक्तीच्या जगावेगळ्या स्वप्नाने, एक असे सुंदर रूप घेतलेले पाहून अचंबा वाटल्याशिवाय राहात नाही. या व्यक्तीच्या बरोबर कोण होते, तर सहा कुष्ठरोगी, एक तरुण पत्नी, दोन लहान मुले, काही कुदळी, फावडी, चौदा रुपये, दोन कुत्री आणि एक लगंडी गाय. या एवढ्या भांडवलावर प्रचंड इच्छाशक्ती व अविरत काम करण्याची जिद्द असलेल्या या माणसाने स्वर्गाहूनही सुंदर जागा या भूतलावर उभी केली.

बाबांना जर कोणी विचारले की, 'तुम्हाला सर्वोच्च आनंद कशात आणि कसा मिळतो ?' तर ते उत्तर द्यायचे की, जेव्हा हातापायांची बोटे झडलेले; पण बरे झालेले हे कुष्ठरोगी साजशृंगार करतात, तेव्हा मला सर्वोच्च आनंद होतो.मला वाटते, या त्यांच्या साजशृंगार करण्याच्या इच्छेत, बाबांना त्यांची जीवनाची आसक्ती दिसत असेल, उत्साह दिसत असेल. स्वतःवर जडलेले प्रेम दिसत असेल.

**कृती १. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.** **गुण ३**

१. बाबांना सर्वोच्च आनंद कशात मिळतो?

२. बाबा आमटे यांचा जन्म कुठे व केव्हा झाला?

३. बाबा आमटे यांचे आयुष्यातील ध्येय काय बनण्याचे होते व ते काय झाले?

**कृती २. खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.** **गुण २**

१. बाबा आमटे यांचे शौक काय होते?

**कृती ३. रिकाम्या जागा भरा.** **गुण १**

१. त्यांना ------------------------------------ हा भेद मान्य नव्हता

२. ती त्यांची प्रथम ---------------------------- होती.

**कृती ४. विरुद्धार्थी शब्द लिहा.** **गुण २**

(खोटे, साम्य, मृत्यु, दु:ख, मृत्यू, सम्या, सच्चे )

१. जन्म X -------------------------- २. भेद X --------------------------------

३. आनंद X ----------------------- ४. खरे X --------------------------------

-----ALL THE BEST-----

# ग्रीनलॉन्स विदयालय

## SECTION – B

दिनांक – ३-१०-२०२५ **TERMINAL EXAMINATION (2025)** वेळ – २ तास

इयत्ता - ८ वी - अ,ब,क **मराठी** मार्क – ४०

**INSTRUCTIONS – Section B answers must be written on the paper itself. And attach paper with Section A answer sheet.**

नाव - ------------------------------------ हजेरी क्र. - -------------- इयत्ता - ८ वी – अ,ब,क

**विभाग – "ब"** **[४० मार्क]**

**प्रश्न १ खालील दिलेल्या कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा. गुण ५.**

व्यायामा, परिश्रम, तहानभूक, आयुष्यातील, व्यायाम, परीश्रम, फिरस्तीची
ताहानभुक, आयुष्यातली, फीरस्तीची

१. ------------------------------ हरपून आम्ही दगडावरची चित्रं रंगवत बसायचो.

२. सध्या ------------------------- ड्युटी आहे ना!

३. -------------------------------- प्रत्येक गोष्ट शाळा – कॉलेजांमध्ये शिकवून येत नसते.

४. सातत्याने ------------------------------ करूनच मी विजेता खेळाडू होऊ शकलो.

५. प्रत्येकाने दररोज थोडा -------------------------- केलाच पाहिजे.

**प्रश्न २ खालील वाक्प्रचारांचा अर्थ लिहा. गुण ३**

आनंद घेणे, माफ करणे, नाराज होणे, कष्ट करवून घेणे, ओसंडून वाहणे, तोंड देणे,

१. सामना करणे - --------------------------------------------------------

२. मजा लुटणे - --------------------------------------------------------

३. राबवून घेणे - --------------------------------------------------------

४. क्षमा करणे - --------------------------------------------------------

५. हिरमोड होणे - --------------------------------------------------------

६. दुथडी भरून वाहणे - --------------------------------------------------

**प्रश्न ३ अ) खालील वाक्यांतील नामे ओळखून त्यांचे प्रकार लिहा.** **गुण ३**

१. शेटजींनी पिशवी उघडून पाहिली.

उत्तर – नाम - ------------------------------ प्रकार - ------------------------------------------

२. बसमध्ये लोकांची गर्दी होती.

उत्तर – नाम - ------------------------------ प्रकार - ------------------------------------------

३. तिने आपली चतुराई दाखवली.

उत्तर - नाम - ------------------------------ प्रकार - ------------------------------------------

**प्रश्न ३ ब) खालील वाक्यांतील सर्वनाम ओळखा.** **गुण ३**

१. त्यांनी सहज पाण्यात उडी मारली. सर्वनाम - -----------------------------------

२. आम्ही बागेत खूप मजा केली. सर्वनाम - -----------------------------------

३. कोणी कोणाला मदत केली आहे? सर्वनाम - -----------------------------------

**प्रश्न ३ क) खालील वाक्यांतील विशेषण ओळखून त्यांचे प्रकार लिहा.** **गुण ३**

१. ते खूप श्रीमंत होते.

उत्तर - विशेषण - ----------------------------------- प्रकार - -----------------------------------

२. विक्रम एकोणीस वर्षांचा आहे.

उत्तर - विशेषण - ----------------------------------- प्रकार - -----------------------------------

३. परम प्रेमळ वृत्तीचा आहे.

उत्तर - विशेषण - ----------------------------------- प्रकार - -----------------------------------

**प्रश्न ४ अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **गुण ३**

| सूंदर, विकसित, सोबती, मुक्त, निष्ट, गुन्हा, विकसीत, मूक्त, सोबत, गून्हा, निष्ठा, सुंदर |
|---|

१. स्वैर - ------------------------------------- २. संगे - ---------------------------------------

३. इमान - ----------------------------------- ४. कसूर - -------------------------------------

५. मनोहर - ------------------------------------ ६. उन्नत - ----------------------------------------

**प्रश्न ४ ब) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **गुण ३**

| |
|---|
| अपचार,अशक्त, पृष्ठभूमी,अर्वाचिन, तेजोहीन,बीजारोपण, बिजारोपण,अर्वाचीन,पृष्टभूमी, आपचार, तेजोहीण |

१. पार्श्वभूमी X ---------------------------------- २. निर्मूलन X --------------------------------------

३. उपचार X ------------------------------------ ४. तेजस्वी X ----------------------------------------

५. प्राचीन X ------------------------------------ ६. सशक्त X ----------------------------------------

**प्रश्न ४ क) खालील शब्दांचे वचन बदला :** **गुण ३**

१. विहीर - -------------------------------- २. उपहारगृह - ----------------------------------

३. लेकरू - ------------------------------- ४. वाटचाल - -----------------------------------

५. घाणा - --------------------------------- ६. घोंगडी - ------------------------------------

**प्रश्न ४ ड) खालील शब्दांचे लिंग बदला.** **गुण ३**

१. राजपुत्र - ------------------------------- २. इंद्र - ---------------------------------------

३. गृहस्थ - -------------------------------- ४. मुलगा - ------------------------------------

५. नायक - -------------------------------- ६. वीर - --------------------------------------

**प्रश्न ५ अ) खालील शब्दांचे अर्थ लिहा.** **गुण ३**

| |
|---|
| अपोआप, उपदेश, आत्मनिर्भर, अमोल, महोदय, परावलंबी, आपोआप, विशाल, ऊपदेश, अनमोल, उन्नती, महोदाय, विशाळ |

१. आपसूक - ------------------------------- २. प्रगती - ------------------------------------

३. शिकवण - ------------------------------ ४. स्वावलंबी - ---------------------------------

५. अमूल्य - -------------------------------- ६. भव्य - --------------------------------------

**प्रश्न ५ ब) खालील शब्दांपासून वाक्य तयार करा.** **गुण ३**

**(make sentences using these words)**

१. माया (Love)- ------------------------------------------------------------------



P.T.O.

२. सुवास (Fragrance)- ------------------------------------------------

३. उदास (Sad)- ------------------------------------------------

**प्रश्न ५ क) खालील शब्दांतून अचूक शब्द निवडून लिहा.** **गुण ३**

१. आर्किमिडीज, आर्किमीडिज, आर्कीमिडीज,अर्किमिडीज - ------------------------

२. व्यक्तीत्वाची, व्यक्तित्वाची, व्यक्तित्त्वाची,व्यक्तितांची - ------------------------

३. बेअदाबी, बेअबादी, बेअदबी, बेअदबि - ------------------------

४. गिरिस्थान, गिरीस्थान, गिरिस्तान, गिरीस्तान - ------------------------

५. व्याक्तिगत, व्यक्तिगट, व्यक्तिगत, व्याक्तीगत - ------------------------

६. नांद्रुकी, नादुकी, नादरूकि, नादरूकी - ------------------------

**प्रश्न ५ क) खालील विरामचिन्हांच्या योग्य जोड्या लावा.** **गुण २**

| क्र. | विरामचिन्हे | उत्तर | चिन्हांची नावे |
|---|---|---|---|
| १. | ! | ------------------------ | अवतरणचिन्ह |
| २. | - | ------------------------ | अर्धविराम |
| ३. | "-" | ------------------------ | संयोगचिन्ह |
| ४. | ; | ------------------------ | उदगारचिन्ह |